MHST080005692026

**नियमीत फौजदारी खटला क्र.१५३/२०२६**
**(शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.४१७/२०२५)**

महाराष्ट्र सरकार

–वि.–

शंकर उर्फ अनिकेत गौतम कांबळे व इतर

**निशाणी क्र.३ वरील आदेश**

अर्जदार रोहित आत्माराम मोरे यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४९७ अन्वये दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे** –

**०२.** सदर नियमीत फौजदारी खटला क्र.१५३/२०२६ हा शिरवळ पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.४१७/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५, ३५२, ३५१(२), २७६, २१७ सह कलम ३(५) अन्वये दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली India Yamaha Motors Pvt. Ltd. कंपनीची मोटरसायकल क्र.MH-11-DY-9047, चेसीस नं.ME1RGA927S0008153, इंजिन नं.G3N4EO985063, Engine CC-150 हे वाहन परत मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वर नमुद वाहन हे त्यांच्या मालकीचे आहे. सदर वाहन हे पोलीसांनी सदर गुन्ह्यात जप्त करुन पोलीस स्टेशनचे आवारात ठेवलेले आहे. सदर गुन्ह्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर वाहन उघडयावर पडून राहिल्यास त्याचे नुकसान होईल. सबब, अर्जदाराने सदर जप्त वाहन परत मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

**<u>०४.</u>** विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर अर्जावर त्यांचा जबाब दाखल केला असून त्यांनी सदर वाहन अर्जदारास परत करण्यास हरकत दर्शविलेली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी सदर वाहन आरोपीच्या ताब्यात कसे आले याबाबत कोणताही खुलासा अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे, त्यांनी सदर वाहन अर्जदार यांना परत करण्यास हरकत दर्शविली आहे.

**<u>०५.</u>** अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.४ लगत दाखल केले आहे. त्याचप्रमाणे अधिक पुराव्याकामी अर्जदार यांच्या आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची व्हेरिफाईड प्रत, वाहन ताबा पावतीची प्रत तसेच वाहन खरेदीची मूळ पावती इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहेत. अभिलेखावर दाखल जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार सदर वाहनाचे नोंदणीकृत मालक आहेत. आजपावेतो अर्जदाराव्यतिरिक्त सदर जप्त वाहनाचा ताबा कोणीही मागितलेला नाही. त्यामुळे अर्जदार जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहेत. प्रस्तुत गुन्हयाचा खटला पूर्ण होणेस बराच अवधी लागणार आहे. तोपर्यंत सदर वाहन पोलीस स्टेशनचे आवारात उभे ठेवल्यास त्याचे नुकसान होण्याची तसेच त्याचे किंमतीत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, अर्जदारास जप्त वाहन अटी व शर्तीवर परत देणे योग्य होईल. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नियमीत फौजदारी खटला क्र.१५३/२०२६, शिरवळ पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.४१७/२०२५ मध्ये जप्त केलेले India Yamaha Motors Pvt. Ltd. कंपनीची मोटरसायकल क्र.MH-

11-DY-9047, चेसीस नं.ME1RGA927S0008153, इंजिन नं.G3N4EO985063, Engine CC-150 हे वाहन अर्जदार रोहित आत्माराम मोरे यांचे असल्याबाबत कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर त्यांना खालील अटींवर परत करण्यात यावे.

अ. अर्जदार यांनी वरील नमुद वाहन यात कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

ब. अर्जदार यांनी सदर वाहनासंदर्भात त्रयस्त इसमाचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नये अथवा सदर वाहन कोणालाही विक्री करु नये आणि कोणाकडे गहाण ठेवू नये.

क. अर्जदार यांनी न्यायालयात रक्कम रुपये १,५०,०००/– चे बंधपत्र (बॉन्ड) भरुन दयावे.

ड. अर्जदार यांनी सदर वाहनाचा वापर कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यामध्ये करु नये.

इ. न्यायालय आदेश करेल त्यावेळेस अर्जदार यांनी सदर वाहन न्यायालयात हजर करावे.

फ. तपासी अमंलदार यांनी सदर वाहन अर्जदारास परत करतांना त्याचा सविस्तर पंचनामा करुन मुददेमालाचा एक रंगीत फोटो काढून न्यायालयाच्या अवलोकनासाठी दाखल करावा.

३. सदरचा अर्ज, त्यावरील आदेश व अर्जातील संपुर्ण कागदपत्रे ही नियमीत फौजदारी खटला क्र.१५३/२०२६, शिरवळ पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.४१७/२०२५ या प्रकरणात दाखल करावेत. सदर आदेशाबाबत तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावे.

SHRUTI GIRISH KUVALEKAR
Digitally signed by SHRUTI GIRISH KUVALEKAR
Date: 2026.06.09 16:47:53 +0530

दिनांकः ०९.०६.२०२६ (श्रीमती. एस. जी. कुवळेकर)
ठिकाणः खंडाळा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.